बिगर सिंचनासाठी पाणी आरक्षण (मोठ्या प्रमाणातील पाणीवापर हक्क) मंजूर करताना उद्भवाचे ठिकाण निश्चीत करण्यासंदर्भातील धोरण.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण-२०१८/(५११/१८)/ सिं.व्य.(धो)

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २०/०७/२०१९

<u>संदर्भ</u> :- १) शासन निर्णय क्रमांक. संकीर्ण २०११/(२५२/११)/सिं.व्य.(धो), दि. १८/५/२०११

२) शासन निर्णय क्रमांक. संकीर्ण २०१५/(४४/१५)/सिं.व्य.(धो), दि. १७/११/२०१६

३) शासन निर्णय क्रमांक. संकीर्ण २०१८/(५११/१८)/सिं.व्य.(धो), दि. १/१२/२०१८

४) शासन निर्णय क्रमांक. बिपापु १००१/(७१३/२००१)/सिं.व्य.(धो), दि.७/४/२००३

५) शासन निर्णय क्रमांक. संकीर्ण १००२/(२५०/०२)/सिं.व्य.(धो), दि. ३०/७/२००३

६) शासन निर्णय क्रमांक. संकीर्ण १००१/(१५४/०१)/सिं.व्य.(धो), दि. २१/०१/२००३

७) सुधारीत छाननी यादीचे पत्र क्र.बिसिंआ २०१८/(२४/१८)सिंव्य (धो-२),दि.५/१०/२०१८

८) शासन निर्णय क्र.२०१७ (३१८/१७)/सिंव्य (धो) दि.१२/१२/२०१८

<u>प्रस्तावना</u> :-

सन २००३ मध्ये राज्याने जलनिती स्विकारली आहे. तद्नंतर MMISF Act २००५ व MWRRA Act २००५ लागू करण्यात आले आहेत.

राज्यातील पिण्याच्या पाण्याची गरज तसेच औद्योगिक व अन्य सिंचनेतर संस्थांचे वापरासाठी सिंचन प्रकल्पातून पाणी पुरवठयाचे धोरण शासनाने स्विकारलेले आहे व त्यानुसार उक्त कारणांसाठी पाणी पुरवठयाचे मान्यतेबाबत शासनाकडून वेळोवेळी शासन निर्णय,परिपत्रके,पत्र व ज्ञापनाद्वारे क्षेत्रिय अधिकारी यांना सूचना व आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. ॲड आशिष जैसवाल विरुध्द नागपूर महानगरपालिका व इतर हया मजनिप्रा याचिका क्र. ८ बाबत दि. १२/९/२०१८ रोजी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई येथे झालेल्या सुनावणीमध्ये दिलेल्या अंतिम निकालानुसार बिगर सिंचन पाणी आरक्षणासंबंधी संदर्भित शासन निर्णयामध्ये आवश्यक त्या सुधारणा/ स्पष्टीकरण देण्याविषयी आदेशीत करण्यात आले आहे. त्यानुसार दि. १/१२/२०१८ च्या एकत्रित शासन निर्णयान्वये यातील काही शासन निर्णय व परिपत्रके अधिक्रमित करुन पाटबंधारे प्रकल्पासाठीच्या जलाशयातील पाणी बिगर सिंचनासाठी आरक्षित/मोठया प्रमाणात पाण्याचा हक्क (Bulk Water Entitlements) मंजूर करणेबाबतचे निकष व कार्यपध्दती याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. याच शासन निर्णयात उद्भव / स्रोत निश्चितीबाबतचे धोरण स्वतंत्रपणे निश्चित करण्यात येईल असेही नमूद केले होते.

विविध प्रकरणातून शासनाच्या निदर्शनास येते की, पाणी पुरवठा योजनेचा उद्भव/ स्रोत, मागणी करणारी संस्था/महाराष्ट्र जीवन प्राधिकरण/स्थानिक स्वराज्य संस्था इ. जलसंपदा विभागाशी पूर्व सल्लामसलत न करता ठरवितात. त्या स्रोतावर आधारीत योजनेची अंदाजपत्रके करुन त्यास प्रशासकीय मान्यता सबंधित विभाग देते व

निविदा देखील काढल्या जातात. नंतर पाणी आरक्षण (पाणी वापर हक्क) मंजुरीचे प्रस्ताव सादर होतात. त्याला इतर लाभधारक संस्था आक्षेप घेतात व वादाचा विषय निर्माण होतो. न्यायालयीन प्रकरणे उद्भवतात पर्यायी स्त्रोतांचे नियोजन, कार्यक्षमता व व्यवहार्यता इत्यादी पडताळणी न केल्याने पिण्याच्या व सिंचन योजनावर विपरीत परिणाम होतो. उपरोक्त बाबींचा विचार करुन व तसेच शासन निर्णय क्रमांक. संकीर्ण-२०१८/ (५११/१८)/ सिं.व्य.(धो), दि.०१/१२/२०१८ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे व महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडील याचिका क्र. ५/२०१८, दिनांक २/११/२०१८ शंकर नागरे विरुध्द महाराष्ट्र शासन मधील निर्देशानुसार दिर्घकालीन बिगर सिंचन आरक्षण / मोठया प्रमाणात पाण्याचा हक्क (Bulk Water Entitlement) मंजूर करताना प्रथमत: उद्भव निश्चिती करण्याच्या कार्यपध्दतीबाबतचे धोरण आखण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या शासन निर्णयान्वये दि. २१/१/२००३ चा शासन निर्णय पूर्णत: अधिक्रमित करुन शासन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

पाणी पुरवठयाच्या प्राधान्यक्रम :-

महाराष्ट्र जलनिती २००३ मधील पाणी वापर शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०११/(२५२/११)/ सिं.व्य.(धो), दि. १८/५/२०११ अन्वये सुधारीत केल्यानुसार खालीलप्रमाणे राहिल.

१) पशुधनासह पिण्यासाठी पाणी तसेच शीतकरण, आरोग्य आणि स्वच्छताविषयक गरजा यासाठी घरगुती वापर.

२) कृषी (सिंचनाकरिता पाणी वापर)

३) औद्योगिक, वाणिज्यिक वापर व कृषी उत्पादनांवर आधारित उद्योगासाठी वापर जलविद्युत.

४) पर्यावरण व करमणुक यासाठीचा वापर

५) इतर सर्व प्रकारच्या वापरासाठी

२) कार्यपध्दती :-

१) बिगर सिंचन मागणी अर्ज करणारी व्यक्ती/ संस्था यांनी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडे सादर करावा. सदर अर्ज करताना पाणी पुरवठयासाठी योग्य व पुरेसा स्त्रोत असलेल्या पर्यायाचा प्रथम अभ्यास करावा व स्त्रोतांचा प्राधान्य क्र. १ चा पर्याय व प्राधान्य क्र. २ चा पर्याय नमूद करावा. छाननी यादी ही दोन पर्यायांची सादर करावी.

२) मागणी अर्ज संस्थेने पर्यायी उद्भव / स्त्रोतांचा अभ्यास करतांना दोनही पर्यायाचे गुण व अवगुण (Merits & Demerits) नमूद करावे. विशेषत: योजनेच्या तांत्रिक, आर्थिक व्यवहार्यता, भौगोलिक व पाणी उपलब्धता निकषाचा त्यात समावेश करावा.

३) कार्यकारी अभियंता यांनी प्राप्त अर्जाची १५ दिवसात क्षेत्रिय तपासणी करुन अधीक्षक अभियंता यांचेकडे प्रस्ताव सादर करावा.

४) अधीक्षक अभियंता यांनी ४ दिवसात पडताळणी करुन प्रस्ताव मुख्य अभियंता यांचेकडे सादर करावा.

५) मुख्य अभियंता यांनी ४ दिवसात पडताळणी दोन्ही पर्यायांवरील स्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव महामंडळास सादर करावा.

६) महामंडळाने प्रस्ताव प्राप्त दिनांकापासून एक महिन्याच्या आत शासन निर्णय क्रमांक संकीर्ण - २०१५/(४४/१५)/ सिं.व्य.(धो), दि.१७/११/२०१६ नुसार पुढील मान्यतेची कार्यवाही करावी.

७) दोन पर्यायापैकी उद्भव स्त्रोत अंतिम करण्यासाठी नदी खोरे अभिकरणाने / महामंडळाने अवलंबण्याची कार्यपध्दती:-

i) उद्भव स्त्रोत व पाणी वापर एकाच महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील असल्यास अंतिम पर्यायाबाबत कार्यकारी संचालकांनी सक्षम प्राधिकारास शिफारस करावी.

ii) उद्भव स्त्रोत व पाणी वापर भिन्न महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील असल्यास अंतिम पर्यायाबाबत उद्भव स्त्रोत ज्या महामंडळाच्या कार्यकक्षेत आहे. त्याच्या कार्यकारी संचालकांनी सक्षम प्राधिकारास शिफारस करावी. तथापि, असा निर्णय घेणेपुर्वी अन्य स्त्रोताबाबत पाणी वापर होणाऱ्या महामंडळाच्या कार्यकारी संचालक यांचे मत विचारात घ्यावे.

३) धोरणात्मक निकष :- उद्भव स्त्रोत पर्याय शिफारस करताना कार्यकारी संचालक यांनी खालील धोरणात्मक निकष विचारात घ्यावेत.

अ) पाणी पुरवठा योजनेसह शाश्वत स्त्रोत असणे अत्यंत महत्वाचे आहे. तसेच वहनव्ययात पाणी नाश होऊ नये हे देखील आवश्यक आहे. त्यामुळे योजनेचा स्त्रोत/ उद्भव हा प्रकल्पाचा जलाशयच असावा. म्हणजेच थेट जलाशयातून बंद वाहिनीव्दारे/नलिकाद्वारे पाणी पुरवठा करणे बंधनकारक आहे.

उद्भव स्त्रोताच्या ठिकाणी ५०%, ७५% व ९५% विश्वासार्हतेने उपलब्ध होणाऱ्या पाण्याची परिगणना करावी. उद्भव स्त्रोतात ९५% विश्वासार्हतेने उपलब्ध होणाऱ्या पाण्यापेक्षा कमी पाणीसाठा शिल्लक असल्यास तसे नमूद करावे. स्त्रोताच्या कमी विश्वासार्हतेमुळे पाणी पुरवठयाच्या शाश्वतेबाबत होणाऱ्या परिमाणांची बाबींची जबाबदारी मागणी करणाऱ्या संस्थेची असेल.

ब) अपवादात्मक परिस्थतीतीतच नदी / कालवा हा उद्भव निवडता येईल. त्याची कारणमिमांसा स्वतंत्रपणे प्रस्तावात व मंजूरी आदेशात नमूद करावी.

स्त्रोताजवळ करावयाच्या जलग्रहण विहिरीची क्षमता किमान ४ तासाच्या साठवण क्षमते इतकी असावी.

नदी अथवा कालवा उद्भव स्त्रोत असल्यास व त्याकरीता वरील धरणातून पाणी सोडावे लागणार असल्यास, त्याची तपासणी करावी व तसा स्पष्ट उल्लेख प्रस्तावात करण्यात यावा.

महाराष्ट्रातील बहुतांश सिंचन प्रकल्पाचे नियोजन आठमाही आहे. त्यामुळे मागणी करणाऱ्या संस्थेने त्यांच्या पाणी पुरवठा योजनेसाठी किमान ६ महिन्यांच्या गरजे इतका पाणीसाठा करणेसाठी आवश्यक साठवणूकीची व्यवस्था करणे बंधनकारक असेल. टंचाई परिस्थिती अथवा धरणात पुरेसा पाणीसाठा न झाल्यास पाणी पुरवठा शाश्वत ठेवण्याची जबाबदारी जलसंपदा विभागाची असणार नाही.

क) अतिविपुलतेच्या खोऱ्यातील योजनेच्या पाणी वापराकरीता तुटीच्या व अतितुटीच्या खोऱ्यातील पाणी उद्भव निवडू नये.

ड) अवर्षण प्रवण भागाकरीता सिंचन प्रकल्पांचा लाभ होणार असल्यास त्यातील पाण्याचा अतिविपुलतेच्या खोऱ्यातील भागासाठी बिगर सिंचन पाणी वापर कटाक्षाने टाळण्यात यावा.

इ) अतिविपुलतेच्या खोऱ्यातील बिगर सिंचन पाणी वापराकरीता नजीकचा स्त्रोत उपलब्ध नसल्यास स्त्रोत निर्माण करण्यासाठी करावयाच्या कामाचा (उदा. को.प. बंधारा, साठवण तलाव) समावेश पाणी पुरवठा योजनेच्या अंदाजपत्रकात करणेबाबत संबंधित मागणी करणाऱ्या संस्थेस कळवावे. बिगर सिंचन पाणी वापर शासन निर्णय क्रमांक. संकीर्ण २०१५/(४४/१५)/सिं.व्य.(धो), दि. १७/११/२०१६ मधील प्रवर्ग निहाय वाटपाच्या मर्यादेत असल्यास हा निकष बंधनकारक असणार नाही. मर्यादेबाहेर, सक्षमस्तरावर कारणमिमांसेह घेतलेला निर्णय अंतिम असेल.

ई) आंतरराज्य नदी खोरे तंटा लवादामधील निर्णयाचा भंग होणार नाही याची व राज्य जल आराखड्यातील तरतुदीची पडताळणी करावी.

उ) बिगर सिंचन पाणी वापर मंजुर केल्यावर सिंचन क्षेत्रात कपात करावी लागते. त्यामुळे शासन परिपत्रक क्रमांकः- विपापु- १००३/(४२१/२००३) / सिं.व्य. (धोरण), दि.२१/२/२००४ व शासन परिपत्रक क्रमांकः संकिर्ण २००८/(१३१/०८)/सिं.व्य (धोरण) दि. ६/३/२००९ नुसार प्राप्त होणारा पुन:स्थापना खर्च घेऊन त्याअंतर्गत त्याच प्रकल्पावर पुनर्स्थापनेची कामे हाती घेण्यात यावी.

ऊ) उद्योगाकरीता पाणी वापर मंजूर करावयाचा असल्यास त्याकरीता जलाशय/ नदी / कालवे यातील पाण्याऐवजी सांडपाणी उपलब्ध होऊ शकते काय याबाबत पडताळणी करावी.

संस्थेनी मागणी केलेल्या प्रस्तावात पाण्याचा पुनर्वापर करण्याबाबतचे नियोजन नमूद करावे. पाणी मागणीच्या किमान ३०% पाण्याचा पुनर्वापर होईल याची दक्षता नियोजन करताना संबंधीत मागणी करणाऱ्या संस्थेने घ्यावी.

पर्याय अंतीम करताना दोन्ही पर्यायांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात यावा. जसे आर्थिक व्यवहार्यता, भौगोलीक कारणामुळे निर्माण होणारी परिस्थिती / अपरिहार्यता, सिंचन प्रकल्पावरील सिंचन क्षेत्रावरील कपात, पुर्वीच्या बिगर सिंचन आरक्षणामध्ये वाढ होत असल्यास सिंचन क्षेत्रावर होणारा परिणाम व उपरोक्त नमुद निकष इत्यादी.

उपरोक्त प्राधान्यक्रम, कार्यपध्दती व धोरणात्मक निकष तसेच इतर स्थानपरत्वे बाबींचा अंतर्भाव करून स्पष्ट अभिप्रायासह शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण- २०१८/(५११/१८)/ सिं.व्य.(धो), दि.०१/१२/२०१८ अन्वये पाणी आरक्षण (मोठ्या प्रमाणातील पाणीवापराच्या हक्क) प्रस्तावास सक्षम स्तरावर मान्यता घ्यावी.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१९०७२०१५०८४८५२२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2019.07.20 15:16:55 +05'30'

सोबत :- छाननी यादी -२

(अ. अ. कपोले)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. सर्व मंत्रालयीन विभाग
५. अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, नगर विकास विभाग १ व २, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. महासंचालक, माहिती व प्रसिध्दी संचालनालय, मुंबई
११. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी, मुंबई
१३. महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य १, मुंबई
१४. महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य २, नागपूर

१५.प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य १, मुंबई

१६.विभागीय आयुक्त, मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/नागपूर व अमरावती

१७.आयुक्त, कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१८. सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई

१९.सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळे/महासंचालक (वाल्मी/मेरी)

२०.सर्व मुख्य अभियंते, जलसंपदा विभाग/पाटबंधारे विकास महामंडळे

२१.सर्व आयुक्त, महानगरपालिका

२२.सर्व जिल्हाधिकारी,

२३.सर्व जिल्हा परिषंदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी

२४.सर्व अधीक्षक अभियंते, जलसंपदा विभाग

२५.सर्व अधीक्षक अभियंते व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण

२६.सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग

२७.सर्व तांत्रिक अधिकारी/कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई

२८. सिं.व्य.(धो)संग्रहार्थ.

शासन निर्णय क्र. (५११/१८)/सिंव्य (धो), दि. २०/०७/२०१९ चे सहपत्र

सुधारीत छाननी यादी

विषय :- पाटबंधारे प्रकल्पातून / नदीतून पिण्यासाठी (घरगुती) वापरासाठी पाणी पुरवठा योजनांच्या मंजूरीचा प्रस्ताव पाठवितांना सादर करावयाची छाननी यादी

१		पाणी पुरवठा योजनेचे नाव, तालूका, जिल्हा व मागणी करणाऱ्या संस्थेचे नांव	:	
२		उद्भव स्त्रोत	:	
	२.१	धरण/जलाशयाचे नाव	:	
	२.२	नदी मधून उपसा असल्यास ज्या धरणातून पाणी सोडावे लागेल त्याचे नाव	:	
	२.३	धरणातून नदीत पाणी सोडावयाचे नसल्यास व नदी हाच स्त्रोत असल्यास नदीचे नाव	:	
	२.४	कालवातून पुरवठा असल्यास ज्या धरणातून पाणी सोडावे लागेल त्या धरणाचे नाव व कालव्याचे नाव	:	
३		प्रकल्पस्थळी उपलब्ध जलनिष्पत्ती (फक्त नदी उद्भव असल्यास त्या नदीची उपलब्ध जलनिष्पत्ती नमूद करावी. जर धरणातून नदीत /कालव्यात पाणी सोडावे लागणार असल्यास त्या धरणाची जलनिष्पत्ती नमूद करावी)	: ५० % ७५ % ९५ %	दलघमी दलघमी दलघमी
४		प्रकल्पीय उपयुक्त पाणीसाठा	:	दलघमी
५		प्रकल्पिय मंजूर पाणी वापर	:	दलघमी
६		प्रकल्पिय अहवालातील सिंचनासाठी तरतूद	:	दलघमी

७		प्रकल्पिय अहवालातील बिगर सिंचनासाठी तरतूद (पिण्यासाठी + औद्योगिक)	:	दलघमी
८	८.१	या प्रस्तावापुर्वी या प्रकल्पातून/ नदीतून (फक्त नदी उद्भव असल्यास) पिण्यासाठी मंजूर केलेला पाणीवापर	:	दलघमी
	८.२	या प्रस्तावापुर्वी या प्रकल्पातून / नदीतून औद्योगिक व इतर कारणासाठी मंजूर केलेला पाणी वापर	:	दलघमी
	८.३	या प्रस्तावापुर्वी या प्रकल्पातून / नदीतून पिण्यासाठी + औद्योगिक कारणाकरिता मंजूर केलेला एकूण पाणी वापर (८.१+८.२)	:	दलघमी
	८.४	या प्रस्तावापूर्वी या प्रकल्पातून / नदीतून मंजूरीस सादर केलेला पिण्यासाठीचा पाणीवापर	:	दलघमी
	८.५	या प्रस्तावापूर्वी या प्रकल्पातून / नदीतून औद्योगिक कारणासाठी प्रस्तावित केलेला पाणीवापर	:	दलघमी
	८.६	या प्रस्तावात पिण्यासाठी मागणी केलेला पाणीवापर	:	दलघमी
	८.७	या प्रकल्पातून / नदीतून बिगरसिंचनासाठी वर्ग होणारा एकूण पाणीवापर (८.३+८.४+८.५+८.६)	:	दलघमी
	८.८	या प्रस्तावापूर्वी बिगर सिंचनासाठी वर्ग होणारा एकूण पाणीवापर व प्रस्तावित बिगर सिंचन पाणी वापर मंजूरी नंतर जलाशयात / नदीत शिल्लक राहणारे पाणी (५-८.७)	:	दलघमी
	८.९	प्रकल्पातून/ नदीतून एकूण होणारे पिण्यासाठीच्या पाणीवापराचे परिमाण	:	दलघमी

	८.१०	एकूण होणाऱ्या पिण्याचे पाणी वापराची प्रकल्पीय पाणी वापराशी टक्केवारी (अ.क्र. (८.९)/ अ.क्र. ५) *१००	:	%
९		एकूण प्रकल्पीय / नदीच्या सिंचन क्षेत्र	:	हे.
१०		आजपर्यंत बिगरसिंचन पाणीवापर मंजूरीमुळे झालेली सिंचन क्षेत्र कपात	:	हे.
११		प्रस्तावित पिण्यासाठीच्या मागणीमुळे होणारी सिंचन कपात	:	हे.
१२		एकूण पिण्यासाठीच्या मागणीमुळे होणारी सिंचन कपात व त्याची प्रकल्पीय सिंचन क्षेत्राशी टक्केवारी	:	हे. %
१३		आता उपलब्ध होणारी सिंचन क्षमता	:	हे.
१४		वरील सिंचन कपातीमुळे रु. १ लक्ष प्रमाणे भाववाढ निर्देशांक लक्षात घेता सिंचन पुर्नस्थापनेचा अद्यावत येणारा खर्च	:	लक्ष
१५		पाणीवापर मागणीच्या परिमाणाची योग्यता	:	
	१५.१	म.ज.नि.प्रा.आदेश क्र. ९/२०१७ दि. २२/०९/२०१७ च्या सुधारीत निकषा मधील अ.क्र. ६. मध्ये नमूद केलेप्रमाणे a) घरगुती पाणी वापराचा मापदंड b) प्रस्तावात गृहीत धरलेला घरगुती पाणीवापराचा मापदंड c) प्रस्ताव सादर केलेल्या वर्षापासून पुढील ३० वर्षात होणारी संभाव्य लोकसंख्या d) संभाव्य लोकसंख्येसाठी मजनिप्रा मापदंडानुसार अनुज्ञेय पाणीवापर	:	 लि/मा/दि लि/मा/दि दलघमी

		e) धरणातून नदीत किंवा कालव्यात पाणी सोडावे लागणार असल्यास त्यामुळे होणारे वहनव्यय (वहनव्यय प्रत्यक्ष पुर्वानुभव वा निरिक्षणानुसार ठरवण्यात यावा.) f) एकूण अनुज्ञेय पाणीवापराचे परिमाण (d+e) g) या संस्थेला यापूर्वी पिण्यासाठी पाणी वापर हक्काचे परिमाण मंजूर केले असल्यास ते येथे नमूद करावे. h)RainwaterHarvesting]Recycling द्वारे उपलब्ध होणारे पाणी परिमाण i) निव्वळ अनुज्ञेय पाणीवापर (f-(g+h) j) शिफारशी योग्य पाणीवापर		दलघमी दलघमी दलघमी दलघमी दलघमी दलघमी
१६		पाणी हक्क मंजूरी करतानाच्या मजनिप्राच्या निर्देशातील अ.क्र. ६.२ नुसार पालन करावयाच्या अटी	:	
	१६.१	धरणातून /जलाशयातून थेट बंद नलिकेद्वारे उचल करण्या ऐवजी नदी/ कालव्यात पाणी सोडून नंतर उपसा करावयाचा असल्यास त्याच्या गरजेबाबतची कारणमिमांसा येथे नमूद करावी.	:	
	१६.२	पाणी मागणी करणाऱ्या संस्थेने तयार केलेला जललेखा (Water Budget) ची तपासणी करुन त्यावरील अभिप्राय येथे नमूद करावा.	:	
	१६.३	६.२ (iii) मधील निर्देशानुसार क्षेत्रिय पाणी वाटप मर्यादेच्या बाहेरील आरक्षण असल्यास मर्यादे बाहेरील परिमाण कृषी वापराकरिता उपलब्ध करून देण्याची जागा निश्चित केली आहे काय ?	:	होय/नाही/लागू नाही

	१६.४	मजनिप्रा आदेश क्र.९/२०१७ मधील ६.२ (vi) नुसार हे CPCB च्या दि.२१/०४/२०१५ च्या निर्देशानुसार संस्थेने सांडपाणी प्रक्रिया व व्यवस्थेचा कालबध्द पूर्ण करण्याचा कृती आराखडा नदी खोरे अभिकरणास / महामंडळास सादर केली आहे का?	:	होय/नाही/लागू नाही
	१६.५	शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१५/(४४/१५)/सिंव्य (धोरण) दि.१७/११/२०१६ नुसार पाणी वापर हक्कास मान्यता प्रदान करण्याचा सक्षम स्तर नमूद करावा.	:	

कार्यकारी संचालक,

------- पाटबंधारे विकास महामंडळ,-------

शासन निर्णय क्र. (५११/१८)/सिंव्य (धो), दि. २०/०७/२०१९ चे सहपत्र

सुधारीत छाननी यादी

विषय :- पाटबंधारे प्रकल्पातून / नदीतून औद्योगिक वापरासाठी मंजूरीचा प्रस्ताव पाठवितांना सादर करावयाची छाननी यादी.

१		पाणी पुरवठा योजनेचे नांव, व मागणी करणाऱ्या संस्थेचे नाव तालुका ,जिल्हा	:	
२		उद्भव स्त्रोत	:	
	२.१	धरण/जलाशयाचे नाव	:	
	२.२	नदी मधून उपसा असल्यास ज्या धरणातून पाणी सोडावे लागेल त्याचे नाव	:	
	२.३	धरणातून नदीत पाणी सोडावयाचे नसल्यास व नदी हाच स्त्रोत असल्यास नदीचे नाव	:	
	२.४	कालवातून पुरवठा असल्यास ज्या धरणातून पाणी सोडावे लागेल त्या धरणाचे नाव व कालव्याचे नाव	:	
३		प्रकल्पस्थळी उपलब्ध जलनिष्पत्ती (फक्त नदी उद्भव असल्यास त्या नदीची उपलब्ध जलनिष्पत्ती नमूद करावी. जर धरणातून नदीत /कालव्यात पाणी सोडावे लागणार असल्यास त्या धरणाची जलनिष्पत्ती नमूद करावी)	: ५० % ७५ % ९५ %	दलघमी दलघमी दलघमी
४		प्रकल्पीय उपयुक्त पाणीसाठा	:	दलघमी
५		प्रकल्पिय मंजूर पाणी वापर	:	दलघमी
६		प्रकल्पिय अहवालातील सिंचनासाठी तरतूद	:	दलघमी
७		प्रकल्पिय अहवालातील बिगर सिंचनासाठी तरतूद (पिण्यासाठी + औद्योगिक)	:	दलघमी

८	८.१	या प्रस्तावापुर्वी या प्रकल्पातून /नदीतून (फक्त नदी उद्भव असल्यास) पिण्यासाठी मंजूर केलेला पाणीवापर	:	दलघमी
	८.२	या प्रस्तावापुर्वी या प्रकल्पातून /नदीतून औद्योगिक व इतर कारणासाठी मंजूर केलेला पाणी वापर	:	दलघमी
	८.३	या प्रस्तावापुर्वी या प्रकल्पातून पिण्यासाठी + औद्योगिक कारणाकरिता मंजूर केलेला एकूण पाणी वापर (८.१+८.२)	:	दलघमी
	८.४	या प्रस्तावापूर्वी या प्रकल्पातून/नदीतून मंजूरीस सादर केलेला पिण्यासाठीचा पाणीवापर	:	दलघमी
	८.५	या प्रस्तावापूर्वी या प्रकल्पातून /नदीतून औद्योगिक कारणासाठी प्रस्तावित केलेला पाणीवापर	:	दलघमी
	८.६	या प्रस्तावात औद्योगिक मागणी केलेला पाणीवापर	:	दलघमी
	८.७	या प्रकल्पातून /नदीतून बिगरसिंचनासाठी वर्ग होणारा एकूण पाणीवापर (८.३+८.४+८.५+८.६)	:	दलघमी
	८.८	या प्रस्तावापूर्वी बिगर सिंचनासाठी वर्ग होणारा एकूण पाणीवापर व प्रस्तावित बिगर सिंचन पाणी वापर मंजूरी नंतर जलाशयात /नदीत शिल्लक राहणारे पाणी (५-८.७)	:	दलघमी
	८.९	प्रकल्पातून /नदीतून एकूण होणारे औद्योगिक साठीच्या पाणीवापराचे परिमाण	:	दलघमी
	८.१०	एकूण होणाऱ्या औद्योगिक पाणी वापराची प्रकल्पीय /नदीच्या पाणी वापराशी टक्केवारी (अ.क्र. (८.९)/अ.क्र.५) *१००	:	%
९		एकूण प्रकल्पीय सिंचन क्षेत्र	:	हे.

१०		आजपर्यत बिगरसिंचन पाणीवापर मंजूरीमुळे झालेली सिंचन क्षेत्र कपात	:	हे.
११		प्रस्तावित औद्योगिक मागणीमुळे होणारी सिंचन कपात	:	हे.
१२		एकूण औद्योगिक मागणीमुळे होणारी सिंचन कपात व त्याची प्रकल्पीय सिंचन क्षेत्राशी टक्केवारी	:	हे. %
१३		आता उपलब्ध होणारी सिंचन क्षमता	:	हे.
१४		वरील सिंचन कपातीमुळे रु. १ लक्ष प्रमाणे भाववाढ निर्देशांक लक्षात घेता सिंचन पुर्नस्थापनेचा अद्यावत येणारा खर्च	:	लक्ष
१५		पाणीवापर मागणीच्या परिमाणाची योग्यता	:	
	१५.१	म.ज.नि.प्रा.आदेश क्र. ९/२०१७ दि. २२/०९/२०१७ च्या सुधारीत निकषा मधील अ.क्र. ७. मध्ये नमूद केलेप्रमाणे a) औद्योगिक पाणी वापराचा मापदंड (७.१ नुसार) b) प्रस्तावात गृहीत धरलेला औद्योगिक पाणीवापराचा मापदंड c) औद्योगिक कारणासाठी मजनिप्रा मापदंडानुसार अनुज्ञेय पाणीवापर d) पर्यावरण मान्यतेच्या आदेशात नमूद केलेला पाणी वापर e) c व d पैकी न्यूनतम पाणीवापर f) धरणातून नदीत किंवा कालव्यात पाणी सोडावे लागणार असल्यास त्यामुळे होणारे वहनव्यय (वहनव्यय प्रत्यक्ष पुर्वानुभव वा निरिक्षणानुसार ठरवण्यात यावा.)	:	 दलघमी दलघमी दलघमी दलघमी

		g) एकूण अनुज्ञेय पाणीवापराचे परिमाण (e+f) h) या संस्थेला यापूर्वी औद्योगिक पाणी वापर हक्काचे परिमाण मंजूर केले असल्यास ते येथे नमूद करावे. i) Rainwater Harvesting द्वारे उपलब्ध होणारे पाणी j)Recycling द्वारे उपलब्ध होणारे पाणी परिमाण k) निव्वळ अनुज्ञेय पाणीवापर (g-(h+i+j) l) शिफारशी योग्य पाणीवापर		दलघमी दलघमी दलघमी दलघमी दलघमी दलघमी
१६		पाणी हक्क मंजूरी करतानाच्या मजनिप्राच्या निर्देशातील अ.क्र. ७.२ नुसार पालन करावयाच्या अटी	:	
	१६.१	धरणातून /जलाशयातून थेट बंद नलिकेद्वारे उचल करण्या ऐवजी नदी/ कालव्यात पाणी सोडून नंतर उपसा करावयाचा असल्यास त्याच्या गरजेबाबतची कारणमिमांसा येथे नमूद करावी.	:	
	१६.२	कृषी आधारित उद्योग आहे का ?	:	होय/नाही/लागू नाही
	१६.३	पाणी मागणी करणाऱ्या संस्थेने तयार केलेला जललेखा (Water Budget) ची तपासणी करुन त्यावरील अभिप्राय येथे नमूद करावा.(लागू असल्यास)	:	
	१६.४	७.२ (iii) Entitlements to new water-intensive industries such as pulp & paper, thermal power plants, textile, tannery, mineral water plants, brewery, soft drink shall not be given in water scarce sub-basins having average annual water availability less than ३००० cubic meter/Ha of Cultivable Command Area (CCA) या निकषाचे पालन झाले आहे का?	:	होय/नाही/लागू नाही

	१६.५	मजनिप्रा आदेश क्र.९/२०१७ मधील ६.२ (vi) नुसार हे CPCB च्या दि.२१/०४/२०१५ च्या निर्देशानुसार संस्थेने सांडपाणी प्रक्रिया व व्यवस्थेचा कालबध्द पूर्ण करण्याचा कृती आराखडा नदी खोरे अभिकरणास / महामंडळास सादर केली आहे का?	:	होय/नाही/लागू नाही
	१६.६	शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१५/ (४४/१५)/सिंव्य (धोरण) दि. १७/११/२०१६ नुसार पाणी वापर हक्कास मान्यता प्रदान करण्याचा सक्षम स्तर नमूद करावा.	:	

-------- पाटबंधारे विकास महामंडळ,-------